## सौदापावती करारनामा

सौदापावती करारनामा मौजे **जळगांव शहर, ता.जि.जळगांव** शिवारातील जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे हद्दीतील खुली व बांधीव एक मजली घरजागेचा आज दिनांक- २४/०८/२०२६ रोजी,

| | |
|---|---|
| **१. हेमंत प्रेमराज बाविस्कर,** उ.व. २० वर्षे, धंदा-<br>आधार कार्ड नंबर - ९९७५ १५०६ ६०८८.<br>**२. अनिता प्रेमराज बाविस्कर,** उ.व. ४८ वर्षे, धंदा- गृहीणी<br>आधार कार्ड नंबर - ९९७५ १५०६ ६०८८.<br>दोघे राहणार - मु. पुनगांव, पो. साकळी, ता.चोपडा.जि.जळगांव. | **लिहून घेणार** |
| **श्री. बापू लटकन निकम,** उ.व. ५५ वर्षे, धंदा- व्यवसाय<br>आधार कार्ड नंबर - ९८९७ ४८९४ ३६४७.<br>राहणार - गट नं. १८, प्लॉट नं. १२/१३, दिलीप किराणा जवळ, कांचन नगर, आर.के. घरा बाजुला, जळगांव, ता.जि.जळगांव. | **लिहून देणार** |

कारणे मी सौदापावती करारनामा लिहून देतो की,

उर्वरीत २

**त्या स्थावर मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा जळगांव पोट तुकडी तालुका जळगांव पैकी मौजे जळगांव शहर शिवारातील जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे हद्दीतील :-

**मौजे जळगांव शहर शेत सर्व्हे नंबर- १८** यात शेतजमिनीत मे. जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जळगांव येथून बिनशेती परवानगी क्रं. जमिन/१०९२/एसआर/३५/९२ दि. ३/४/१९९२ अन्वये व त्यांनी मंजूर केलेल्या नकाशा प्रमाणे बखळ प्लॉटस् पाडलेले आहेत. त्या प्लॉटांचे पैकी -

**बखळ प्लॉट नंबर- १२(बारा) याचे एकुण क्षेत्र आर, चौरस मीटर १८.३८.२४ याचे क्षेत्र चौरस मीटर १८३८.२४.** या संपूर्ण क्षेत्राचे प्लॉट जागेपैकी -

**पुर्व बाजुकडील तुकडा नंबर १३/१/३ याचे क्षेत्र चौरस मीटर ३४.००.**

| | | |
|---|---|---|
| *** याची लांबी रूंदी *** | पुर्व बाजु मीटर - ८.५. | पश्चिम बाजु मीटर - ८.५० |
| | उत्तर बाजु मीटर - ४.००. | दक्षिण बाजु मीटर - ४.०० |
| *** यांसी चतु:सिमा *** | पुर्वेस - प्लॉट नंबर ११. | पश्चिमेस - सदर प्लॉटचा उर्वरीत भाग. |
| | उत्तरेस - प्लॉट नंबर ८. | दक्षिणेस - ३ मीटरचा रोड |

येणेप्रमाणे प्लॉट जागेवर बांधकाम करणेसाठी मे. म्युन्सिपल कॉर्पोरेशन ऑफ दि सिटी ऑफ जळगांव / जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचेकडील बांधकाम परवानगी पत्र क्रं. No.: T.P./B.P./०३२४ दि. २६/०७/२०१९ अन्वये व मंजूर प्लॅननुसार सदर प्लॉट जागेवर आर.सी.सी. पध्दतीचे बांधकाम केलेले आहेत.

सदर प्लॉट जागेचे क्षेत्रात एक लिव्हींग रूम, एक किचन रूम, टॉयलेट व बाथरूम असे आर.सी.सी. पध्दतीत बांधकाम केलेले आहेत. सदर घराचे भिंती विटा, सिमेंत रेती यात पक्के बांधकाम केलेले असून सर्व भिंती स्वतंत्र मालकीच्या आहेत व राहील. तसेच सदर घरजागेत इलेक्ट्रीक फिटींग व नळाची फिटींग केलेली असून त्यासाठी आवश्यक ते कनेक्शन तुम्ही लिहून घेणार यांनी खरेदीनंतर तुमच्या स्वखर्चाने करून घ्यावे. सदर घरजागा गचची ताब्याचे मालकी हक्कासह.

येणे प्रमाणे चत:सिमेतील खुली व बांधीव एक मजली घरजागा आतील दगड, माती,जमिन, झाड, झुडपे, दरवाजे, खिडक्या, कपाटे, गच्ची ताब्याचे हक्कासह व इतर तंद्‌गभुत वस्तुसुध्दा आम्ही तुम्हांस **रक्कम रुपये- ११,००,०००/- अक्षरी रुपये- अकरा लाख मात्रवर** आज रोजी कायम स्वरुपी पूर्ण मालकी हक्काने कायम खरेदीखत करून देण्याचा सौदा तुमचेशी पक्का केलेला असून बयाणा म्हणून **रक्कम रुपये- २,००,०००/- अक्षरी रुपये- दोन लाख मात्र** तुम्ही लिहून घेणार यांनी मला आज रोजी खालील साक्षीदारासमक्ष नगदी रोख स्वरुपात दिले.

*** सदर कराराच्या अटी व शर्ती ***

१) सदर सौद्यातील एकुण रक्कमेतुन मी तुमचेकडून घेतलेली बयाणा रक्कम वजा करून बाकी राहीलेली **रक्कम रुपये- ९,००,०००/- अक्षरी रुपये- नऊ लाख मात्र** तुम्ही लिहून घेणार यांनी मला आज दि. २४/०८/२०२६ पासुन **मुदत ०२(दोन) महिन्याच्या आंत किंवा त्यापूर्वी** द्यावयाचे आहे. त्यावेळेस सदर मिळकतीचे खरेदीखत मी तुम्हांस लिहून नोंदवुन देईल .

२) सदर ब्लॉक घरजागेचे खरेदीखत तारीखेपर्यंतचे बिनशेत सारा व टॅक्सेस्, म.न.पा टॅक्स, व इतर सरकारी कर भरण्याची जबाबदारी माझेवर आहे व राहील. तसेच सदर मिळकतीचे खरेदीखत मी तुम्हांस लिहून व नोंदुवन दिल्यानंतर सदर मिळकतीचे पुढील बिनशेत सारा व टॅक्सेस्, म.न.पा टॅक्स, व इतर सरकारी कर तुम्ही लिहून घेणार यांनी भरावयाचे आहे.

३) सदर मिळकत खरेदीचे वेळेस जो काही खर्च लागेल उदा.स्टॅम्प,नोंदणी फी, लिखाई अगर इतर सर्व खर्च तुम्ही करावयाचा आहे.

४) सदर मिळकत मी यापूर्वी इतर कोठेही गहाण, दान, खरेदी, विक्रीत, बक्षिस करारात बोज्यात जप्तीत अगर जामिनकित दिलेली नाही अथवा अडकविलेली नाही. भविष्यात तसे काहीही आढळल्यास त्याचे सर्व निवारण मी माझ्या खर्चाने करून देईल. त्या खर्चाची कोणतीही तोषीस तुम्हास लागु देणार नाही.

५) सदर मिळकतीचे खरेदीखत तुम्ही सांगाल त्या एक अगर अनेक नावाने मी तुम्हांस लिहून व नोंदवुन देईल.

सदर सौदापावती करारनामा माझेवर व माझे वंशवारसांवर तसेच तुमचेवर व तुमचे वंशवारसदारावर बंधनकारक आहे व राहील.

येणेप्रमाणे सौदापावती करारनामा मी माझ्या राजीखुशीने कोणत्याही दडपणास बळी न पडता पूर्णपणे शुध्दीत राहून स्वत: स्वाक्षरीसह लिहून दिला असे.

**लिहून देणार सही** ---------------------------------------------

**श्री. बापू लटकन निकम**

**लिहून घेणार सही** ---------------------------------------------

**१. हेमंत प्रेमराज बाविस्कर**

A.P.B

---------------------------------------------

**२. अनिता प्रेमराज बाविस्कर**

**-: साक्षीदार :-**

१) वाल्मीक पाटील
नांव वाल्मीक पाटील
पत्ता मु.पो. शिरसोली जळगाव

२) [signature]
नांव [illegible] कोळी
पत्ता मु.पो. शिरसोली जळगाव